30 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Varsity students conduct digital literacy campaign for villagers

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Students of the Electronics department of the Shivaji University, Kolhapur (SUK) had organised a week long digital literacy campaign at the Varange village earlier last week. During the campaign, the villagers were given lessons on the cashless transactions, digital lockers and e-commerce. 450 families participated in the event.

TOI



Yashwantrao Chavan School conducted a one-day workshop on 'Yashwantrao Chavan and development of Maharashtra'

**Seminar at Yashwantrao Chavan school:** The Yashwantrao Chavan School of Rural Development had conducted a workshop at SUKon Yashwantrao Chavan and the development of Maharashtra topic earlier last week. Registrar V D Nandavadekar inaugurated the workshop.

**Lectures at C-DAC:** A one-day lecture on the opportunities in C-DAC was conducted at the Department of Computer Science last week. The department had signed a memorandum of understanding and the lecture was based on that. According to the university officials, C-DAC Pune is conducting research work on the Natural Language Processing and it is quite a challenging work.

30 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# युवा महोत्सव एका क्लिकवर

## शिवोत्सव ॲपद्वारे विद्यार्थ्यांना मिळणार माहिती : विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख देशभर

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठासह कोल्हापूरची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यासाठी **shivostav 2017** हे मोबाईल ॲप बनवण्यात आले आहे. हे ॲप विनामूल्य डाऊनलोड करता येणार असून, युवा महोत्सवाचे वेळापत्रक, स्थळ, कोल्हापूरची वैशिष्ट्ये आणि परंपरांची माहिती विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** संकेतस्थळावर हे ॲप उपलब्ध असेल.

शिवाजी विद्यापीठात १० ते १४ फेब्रुवारीदरम्यान राष्ट्रीय युवा महोत्सव रंगणार आहे. त्याची माहिती **shivostav 2017** या ॲपच्या माध्यमातून देशातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. युवा महोत्सवातील सूरवाद्य, मूकनाट्य, लोकनृत्य, सुगम गायन, समूहगीत, लोककला, लोकवाद्यवृंद, शास्त्रीय गायन, लघुनाटिका, ऑन दी स्पॉट फोटोग्राफी, वादविवाद, वक्तृत्व, रांगोळी स्पर्धा, पारंपरिक वेशभूषा, शास्त्रीय नृत्य यासारख्या २६ कलाप्रकारांचे दर्शन महोत्सवात होणार आहे. या कलाप्रकारांचे विद्यापीठातील लोककला केंद्र, भाषा भवन वि. स. खांडेकर सभागृह, म्युझिक विभाग, वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी सभागृह आणि मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात सादरीकरण होणार आहे.

भोजन, निवास व्यवस्था. रेल्वेस्टेशन, बसस्टँडवर उतरल्यानंतर विद्यापीठाकडे जाण्यासाठीचा मार्ग, रिक्षा, बसथांबे, प्रवास भाडे या माहितीचा गुगल मॅप या ॲपवर देण्यात आली आहे. यातून महोत्सवाचे वेळापत्रक, कलाप्रकार, त्यातील पर्यवेक्षक, अंतिम निकाल, कोल्हापूरची परंपरा, वैशिष्ट्यांचे दर्शन विद्यार्थ्यांना होणार आहे. या ॲपवर कोल्हापुरी चप्पल, कोल्हापुरी साज, कोल्हापूरची खाद्यसंस्कृती यामध्ये कोल्हापुरी मिसळ, तांबडा-पांढरा रस्सा यासह सर्व खाद्यपदार्थांची माहिती, अंबाबाई मंदिर, जोतिबा, खिद्रापूर, नृसिंहवाडी या धार्मिक स्थळांबरोबर पन्हाळा, बर्की, गगनबावडा, करूळ, भुईबावडा आंबा, फोंडा घाट, राधानगरी, काळम्मावाडी धरण आदी पर्यटनस्थळांची माहिती पाहावयास मिळणार आहे.

महोत्सवासाठी स्टेज, निवास, भोजन आदींसाठी २६ समित्या तयार केल्या आहेत. विद्यार्थ्यांना तातडीने त्याची माहिती मिळण्यासाठी या समितीतील सदस्यांचे मोबाईल क्रमांक या ॲपवर आहेत.



**१० ते १४ फेब्रुवारी दरम्यान आयोजन**

### ४ दिवसांत काम पूर्ण होणार

राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी **'shivostav 2017'** हे ॲप तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. कार्यक्रमाची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. ॲपच्या निर्मितीसाठी इंटरनेट विभागप्रमुख डॉ. एम. जे. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली चार कर्मचारी कार्यरत आहेत. चार दिवसांत हे ॲप कार्यरत होईल.

देशातील विविध राज्यांतील विद्यापीठांतून विद्यार्थी या महोत्सवासाठी येणार आहेत. प्राध्यापक, कलाकार विद्यार्थी, पालकांना **'shivostav 2017'** मोबाईल ॲपच्या माध्यमातून एका क्लिकवर घरबसल्या या महोत्सवाची माहिती मिळणार आहे. विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. त्यांना इतर सुविधा मिळाव्यात, शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख देशभर पोहोचावा, या भुमिकेतून या ॲपची निर्मिती केली आहे.

**डॉ. एम. जे. जोशी, इंटरनेट विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ**